शब्दांना सत्याची धार

प्रहार

मुंबई ■ रविवार, ९ जुलै २०१८ ■ RNI Reg.No .: एमएएचएमएआर/२००५/१८६८१ ■ वर्ष १४ ■ अंक २५७ ■ पाने १६ (कोलाजसह) ■ ₹ ४.००

# कामगार पाल्यांसाठी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण वर्ग

**मुंबई (प्रतिनिधी)** : कामगार पाल्यांसाठी राज्यात लवकरच स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या केंद्रांमध्ये हे वर्ग सुरू होणार आहेत. यात यूपीएससी, एमपीएससी यासह बँकिंग, पोलीस, तलाठी, लिपिक, स्टाफ सिलेक्शन अशा सर्व महत्त्वाच्या सरळसेवा भरती परीक्षांचा समावेश आहे. कामगार मंत्री संभाजी पाटील-निलंगेकर यांच्या निर्देशांनुसार सदर योजना सुरू करण्यात येत आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची राज्यभरात २२७ केंद्र आहेत. या केंद्रांमध्ये कामगारांच्या कुटुंबीयांसाठी शिवणवर्ग, शिशुमंदिर, वाचनालये, अभ्यासिका, ग्रंथालये असे उपक्रम राबविण्यात येत असतात. तसेच विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. परंतु मंडळाने कौशल्य विकास प्रशिक्षण आणि रोजगाराभिमुख योजना राबविण्याकडे अधिक लक्ष द्यावे, असे निर्देश कामगार मंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार कामगार विभागाचे प्रधान सचिव राजेश कुमार यांच्या मार्गदर्शनानुसार कामगार पाल्यांसाठी स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू करण्याची योजना तयार करण्यात आली. मंडळाच्या शिफारसीनुसार शासनाने नाशिकच्या स्पेक्ट्रम अॅकॅडमी या संस्थेस पुढील दोन वर्षांसाठी हे काम दिले आहे. कामगार पाल्यांनी मंडळाच्या नजीकच्या केंद्रात जाऊन सदर वर्गासाठी नोंदणी करावयाची आहे. विद्यार्थ्यांच्या नोंदणीनुसार त्या त्या केंद्रांतून स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू केले जाणार आहेत. केंद्रांचे सविस्तर पत्ते मंडळाच्या **www.mlwb.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग, बँक, स्टाफ सिलेक्शन, रेल्वे, एमबीए एन्ट्रन्स, पोलीस, तलाठी, लिपिक, टंकलेखक व इतर सरळसेवा भरती परीक्षा वर्गांचे आयोजन केले जाणार आहे. परीक्षेच्या अभ्यासक्रमानुसार २ महिने ते ८ महिने कालावधीचे वर्ग असणार आहेत. यूपीएससी मार्गदर्शन वर्गासाठी विद्यार्थ्यांकडून नाममात्र ५०० रुपये आणि एमपीएससी वर्गासाठी २५० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचा स्टडी मटेरियल, टेस्ट सीरिजचा खर्च मंडळ करणार आहे. प्रत्येक बॅचमध्ये ३० ते ५० विद्यार्थी असतील. यातील ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव आहेत. कामगार पाल्यांनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांनी केले आहे.